# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १७९-२०२२ दिनांक :- ११/०६/२०२२

## घरकामासाठी दुबई येथे घेवून गेलेल्या मात्र कुटूंबाशी संपर्क होवु न दिलेल्या १८ वर्षाचे मुलीस दुबई येथुन भारतात सुखरुप आणुन पालकांच्या ताब्यात दिले.

दिनांक ०२/०६/२०२२ रोजी तक्रारदार यांनी मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांना समक्ष तक्रार दिली की, 'त्यांच्या १८ वर्षाचे मुलीस घरकामाकरीता व लहान मुलांचा सांभाळ करणेकरीता दुबईला एका भारतीय महिलेने ०१ वर्षाचा करार करुन नेले आहे. मात्र मागील २४ दिवसांपासुन त्यांचा मुलीशी काहिही संपर्क नसून ज्या महिलेने सदर मुलीस दुबईला नेले आहे त्या महिलेचे भारतातील नातेवाईक तुमच्या मुलीला तुम्ही दुबईला जावुन घेवुन या असे सांगत असल्याने त्यांच्या मुलीला भारतात परत आणण्याची कार्यवाही करुन त्यांचे मुलीची सुटका करण्यात यावी' बाबत तक्रार अर्जामध्ये नमुद केले होते.

सदर तक्रारदार महिला यांची तक्रार जाणुन मा. पोलीस आयुक्त यांनी पासपोर्ट शाखेच्या महिला पोलीस उपनिरीक्षक शितल शिंदे यांना सदरबाबत तात्काळ आवश्यक ती मदत करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले. त्यानुसार पोउपनि शिंदे व महिला पोलीस अंमलदार मंजुषा गुप्ता यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेवुन, त्यांनी Consulate General of India- Dubai चे ॲम्बेसेडर श्री ए ई संजय सुधिर यांना इमेल करुन सदर प्रकाराबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे पिडीत मुलीशी तक्रारदार महिला यांचेशी बोलणे करुन दिले. मात्र पिडीत मुलीला एक वर्षाच्या करारावर घेवून जाणारी महिला सदर मुलीस भारतात पाठविण्यास तयार होत नसल्याने तीला कायदेशीर तरतुदींची जाणीव करुन दिल्यानंतर तीने सदर मुलीस भारतात पाठविण्यास संमती दर्शविली. त्यानंतर सर्व तांत्रीक बाबींची पुर्तता पुर्ण करुन दिनांक ०५/०६/२०२२ रोजी पिडीत मुलीला दुबई वरुन भारतात परत आणले व पिडीत मुलीस सुखरुप तीचे आईचे ताब्यात दिले. तक्रारदार यांची मुलगी सुखरुप ताब्यात मिळाल्याने तिचे पालकांनी पोलीसांचे आभार मानून समाधान व्यक्त केले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे मार्गदर्शनाखाली पासपोर्ट शाखेच्या पोउपनि शितल शिंदे व मपोहवा मंजुशा राजन गुप्ता यांनी केलेली आहे.

---ooo---